दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | सोमवार, 3 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 87 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM




# महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर वाढणार;
# अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट

**मुंबई: वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून पुढील तीन दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राच्या ताज्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, 3 ऑगस्ट रोजी कोकण-गोवा किनारपट्टीवरील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी जोरदार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. पावसाचा वाढता जोर लक्षात घेऊन काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

रायगड, रत्नागिरी, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर तसेच विदर्भातील अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि वर्धा जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. याशिवाय रत्नागिरी, सातारा घाट परिसर, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांमध्येही आज पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकणातील बहुतांश भागांत पावसाच्या सरी कायम राहतील. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. तर विदर्भात मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. सततच्या पावसामुळे सखल भागात पाणी साचणे, घाट रस्त्यांवर घसरडी परिस्थिती निर्माण होणे आणि काही ठिकाणी वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, नदी-नाल्यांच्या परिसरात जाणे टाळावे आणि हवामान विभाग तसेच स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**मुंबई शहरात आज असं राहिल वातावरण**

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आज दिवसभर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता असून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, विशेषतः सखल भागातील रहिवासी आणि प्रवाशांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे. आज दुपारी 2:43 वाजता 4.27 मीटरची उच्च भरती येणार आहे. त्यानंतर रात्री 8:50 वाजता 1.06 मीटरची ओहोटी असेल. तर 4 ऑगस्ट रोजी पहाटे 3:16 वाजता 3.84 मीटरची उच्च भरती आणि सकाळी 8:42 वाजता 1.53 मीटरची ओहोटी होणार आहे. गेल्या 24 तासांत मुंबईसह उपनगरांमध्ये चांगल्या पावसाची नोंद झाली आहे. 2 ऑगस्ट रोजी सकाळी 8 वाजल्यापासून 3 ऑगस्ट रोजी सकाळी 8 वाजेपर्यंत शहर भागात 19.56 मिमी पावसाची नोंद झाली. पूर्व उपनगरांमध्ये सर्वाधिक 65.77 मिमी, तर पश्चिम उपनगरांमध्ये 44.37 मिमी पाऊस झाला. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील काही तासांतही अधूनमधून पावसाच्या सरी कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक असल्यासच घराबाहेर पडावे आणि भरतीच्या वेळेत समुद्रकिनाऱ्याजवळ जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



## एसआयआर साठी अवघे काहीच दिवस शिल्लक ; नागरिकांनी मॅपिंग पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा : नगराध्यक्षा सौ .पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

### ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख त्यापूर्वी प्रक्रिया पूर्ण करा

**परळी वैजनाथ : प्रतिनिधी**

विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेचा अंतिम टप्पा सुरू असून प्रत्येक पात्र मतदाराची नोंद आणि मॅपिंग पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख असुन या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व नागरिकांना या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन परळीच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा सर्वात मोठा आधार आहे. त्यामुळे कोणताही पात्र मतदार एसआयआर प्रक्रियेपासून वंचित राहू नये. ज्या नागरिकांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही त्यांनी तातडीने आपल्या परिसरातील बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांच्याशी




संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. नोकरी, शिक्षण, व्यवसाय किंवा इतर कारणांनी बाहेरगावी वास्तव्यास असलेल्या नागरिकांनीही आपल्या कुटुंबीयांशी अथवा संबंधित बीएलओ यांच्याशी संपर्क साधून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. आज घेतलेली थोडीशी खबरदारी उद्याचा मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवेल. प्रत्येक नागरिकाने ही जबाबदारी ओळखून सहकार्य करावे. आपले कुटुंब, नातेवाईक आणि शेजारी यांनाही एसआयआर प्रक्रियेबाबत जागरूक करा. आपल्या शहरातील एकही पात्र मतदार वगळला जाणार नाही, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असेही नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी म्हटले आहे. ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख असुन परळी शहरातील नागरिकांनी उर्वरित कालावधीत बीएलओ यांना सहकार्य करून १०० टक्के एसआयआर मॅपिंग पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

## अभियंता शशिकांत उरगुंडे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव

**लातूर प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग विभागातील उपविभागीय अभियंता शशिकांत महारूद्रप्पा उरगुंडे हे ३२ वर्षांपेक्षा जास्त कालावधी सेवा देऊन नियत वयोमानानुसार ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त लातूर येथील राष्ट्रीय महामार्ग विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचा गौरव सोहळा आयोजित केला होता.

वृंदा हॉटेलच्या हॉलमध्ये आयोजित ऋणानुबंध व सेवागौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित उपविभागीय अभियंता प्रल्हाद कोरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लेखक आणि व्याख्याते डॉ.राजशेखर सोलापुरे आणि इंजि.अमित उबाळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वत्सलाबाई महारुद्रप्पा उरगुंडे, शुभांगी शशिकांत उरगुंडे याही व्यासपीठावर उपस्थित होत्या.




याप्रसंगी बोलताना डॉ. राजशेखर सोलापुरे म्हणाले की, प्रशासनात कार्य करताना प्रामाणिकता व सचोटी कमी होत असताना मूल्यनिष्ठेने आपली जबाबदारी पार पाडणारे शशिकांत उरगुंडे पारदर्शक कार्यसंस्कृतीचे प्रतीक आहेत. प्रागतिक विचारांचा आग्रह त्यांनी धरला आणि समाजात जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला आहे. महात्मा बसवेश्वर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची कास त्यांनी आपल्या नोकरीच्या ठिकाणीही नाही सोडली. लिंगायत धर्म मान्यतेच्या चळवळीत त्यांचे योगदान मोठे आहे. मूल्यांशी तडजोड न करता निष्कलंक चारित्र्य त्यांनी जपले, जे भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. अध्यक्षीय समारोपात प्रल्हाद कोरे म्हणाले की, आपल्या कामाचा कोणताही ताण न घेता सर्वांना सोबत घेऊन काम करणाऱ्या शशिकांत उरगुंडे यांनी एक उत्तम टीम तयार केली. याप्रसंगी ॲड.एस. टी.पाटील चिघळीकर, सिध्देश्वर पाटील, बसवराजप्पा वळसंगे, अक्षय पांढरे, अजिंक्य गायकवाड, संतोष माने, भारत काळे, इंजि.इंद्राळे, दयानंद काळशेट्टे, शिवा गुजर, शुभांगी उरगुंडे, श्रेयस उरगुंडे, श्रेया उरगुंडे यांनी शशिकांत उरगुंडे यांच्या कार्यगौरवार्थ मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले तर आभारप्रदर्शन एस.पी.रोडे यांनी केले.

## महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल पाहायला मिळत आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील काही भागांसाठी पावसाचा इशारा जारी केला असून, विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, राज्यातील कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि विदर्भातील काही भागांमध्ये पावसाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. कोकण आणि घाटमाथ्यावर हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळू शकतात, तर काही ठिकाणी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाची शक्यता असून, विदर्भात हवामान विभागाने विशेष सतर्कतेचा इशारा दिला आहे. विदर्भातील काही भागांत विजांचा कडकडाट, वादळी वारे आणि जोरदार पावसाची शक्यता असल्याचे ने सांगितले आहे.

### नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**विजांचा कडकडाट होत असताना नागरिकांनी मोकळ्या मैदानात जाणे टाळावे. तसेच झाडाखाली उभे राहणे, विजेच्या खांबांजवळ थांबणे आणि पावसाळी प्रवासात निष्काळजीपणा करणे टाळावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांनीही हवामानाचा अंदाज घेऊन शेतीची कामे करावीत, असा सल्ला देण्यात आला आहे. अचानक येणाऱ्या पावसामुळे नदी-नाले, ओढे आणि सखल भागांमध्ये पाणी साचण्याची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासनानेही तयारी ठेवली आहे.**



राज्यातील हवामानाची स्थिती लक्षात घेता हवामान विभागाने सहा जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट (Yellow Alert) जारी केला आहे. यामध्ये रत्नागिरी, सातारा, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामानाचा अंदाज घेऊनच घराबाहेर पडावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



## संपादकीय

### बैलाविना शेतीला मजा नाही!

रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी-बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय सुद्धा सुरक्षित राहतात.

आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे. आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.






# एका संकल्पातून उभा राहिलेला सेवायज्ञ... श्री अन्नपूर्णा चॅरिटेबल ट्रस्ट, परळी वैजनाथ १३ वर्षांच्या अखंड सेवेचा प्रेरणादायी प्रवास

"दानांमध्ये अन्नदान श्रेष्ठ, कारण ते थेट भुकेच्या वेदनेवर उपाय करते." भारतीय संस्कृतीने हजारो वर्षांपूर्वी दिलेला हा संदेश आजही तेवढाच जिवंत आहे. या विचाराला कृतीचे रूप देत, पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या पावन नगरीत गेली तेरा वर्षे निःस्वार्थ भावनेने अखंड अन्नदान आणि समाजसेवा करणाऱ्या श्री अन्नपूर्णा चॅरिटेबल ट्रस्ट, परळी वैजनाथने समाजासमोर सेवेचा आदर्श उभा केला आहे.

या सेवायज्ञाची सुरुवात एका मोठ्या स्वप्नातून झाली. कै. ओमसेठ लाहोटी यांनी २०१३ मध्ये केदारनाथ यात्रेला निघताना आपल्या मनातील एक इच्छा व्यक्त केली होती—"प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक शिवभक्ताला या नगरीत नित्य भोजन प्रसाद निःशुल्क मिळाला पाहिजे." परंतु नियतीला काही वेगळेच मंजूर होते. केदारनाथच्या भीषण आपत्तीत ते ईश्वरी चरणी विलीन झाले. मात्र त्यांची ती अंतिम इच्छा त्यांचे लहान बंधू श्री अनिल लाहोटी आणि त्यांच्या मित्रपरिवाराने स्वतःचे कर्तव्य मानून पूर्ण करण्याचा निर्धार केला.

माहेश्वरी सावण ( गुरु पौर्णिमा) ते पोळा या कालावधीत फक्त रविवारी अन्नदान करण्याच्या छोट्याशा उपक्रमाने या सेवेला प्रारंभ झाला. शनि मंदिर देवस्थान समितीच्या सहकार्याने सुरू झालेल्या या उपक्रमाला परळीकरांनी आणि बाहेरगावच्या भाविकांनी भरभरून प्रतिसाद दिला. श्रावण संपला, पण सेवा थांबली नाही. रविवारनंतर सोमवार, मग शनिवार आणि पुढे दररोज सकाळ-संध्याकाळ नित्य अन्नदान सुरू झाले. एका छोट्याशा उपक्रमाचे आज अखंड सेवायज्ञात रूपांतर झाले आहे.




याच सेवेतून श्री अन्नपूर्णा चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना झाली. आज सलग तेरा वर्षे एकही दिवस खंड न पडता अन्नदान सेवा सुरू आहे. स्वच्छता, टापटीप, शिस्त, आत्मीयता आणि सेवाभाव ही या संस्थेची ओळख बनली आहे. प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना प्रसादरूप भोजन देतानाच गरजू, निराधार आणि उपाशी बांधवांनाही सन्मानाने भोजन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था येथे करण्यात आली आहे. येथे कुणालाही प्रतीक्षा करावी लागत नाही; कारण येथे भुकेपेक्षा माणुसकी मोठी मानली जाते.

अन्नदानाबरोबरच समाजोपयोगी अनेक उपक्रम ट्रस्टने सातत्याने राबविले आहेत. निराधार महिलांना महिनाभराचा किराणा प्रत्येक महिन्यास पुरविणे, गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारणे, पुस्तके, वह्या, गणवेश, गरजुस सायकल वितरण, शाळांमध्ये ग्रंथदान करून वाचन संस्कृती रुजविणे, "Food For Life – Save Food" अभियानातून अन्न वाया जाऊ नये यासाठी हजारो विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे, उन्हाळ्यात जलसेवा, पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था, तसेच "बेटी बचाव" उपक्रमांतर्गत नवजात कन्यांच्या नावाने मुदतठेव करून त्यांच्या भविष्याची आर्थिक तरतूद करणे—अशा अनेक उपक्रमांनी ट्रस्टने समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कोरोना महामारीच्या अभूतपूर्व संकटातही ट्रस्टची सेवा थांबली नाही. उलट ती अधिक व्यापक झाली. क्वारंटाईन कुटुंबांना तसेच रोजगार निमीत्त परळीत येवून राहिलेल्या रोजंदारी गरजुना घरपोच सकाळ-संध्याकाळ भोजन पुरविणे, गरजूंना मदतीचा हात देणे ही सर्व सेवा प्रशासनाच्या सहकार्याने निर्भयपणे सुरू ठेवली , हा मानवतेचा एक प्रेरणादायी अध्याय ठरला. लॉकडाऊनमुळे सर्व व्यवहार ठप्प झाले; पण ट्रस्टची चूल विझली नाही आणि सेवेचा प्रवाहही थांबला नाही.

तेरा वर्षांच्या या प्रवासात अनेक आव्हाने आली. दोन वेळा कार्यस्थळ बदलले; पण प्रत्येक वेळी सेवा अधिक व्यापक, अधिक सुंदर आणि अधिक प्रभावी होत गेली. आज श्री दत्त – श्रीराम मंदिर (बालाजी मंदिर) परिसरातून ही सेवा अधिक जोमाने सुरू आहे. रोज सकाळी ११ ते ३ व सायंकाळी ७ ते ९ अशा वेळेत सेवा दिली जाते रोजचे एक हजार ते पंधराशे भक्त व गरजू लोक याचा लाभ घेतात . वैद्यनाथ प्रभू च्या दर्शनास जेवढी गर्दी वाढते त्याप्रमाणे इथली सेवा विस्तारीत होत जाते.

- **या ट्रस्टचे अनिलकुमार लाहोटी (अध्यक्ष**
- **कचरुलाल उपाध्याय (उपाध्यक्ष )**
- **संजय स्वामी (सचिव ) उमेश टाले (सह सचिव )**
- **शिवराज उदगीरकर ( कोषाध्यक्ष ) तर विश्वस्त सदस्य सर्वश्री**
- **गोपाल लाहोटी, रमेश राददंड, विजयजी पाठक, उत्तम शास्त्री महाराज,राकेशजी चांडक, संतोषप्पा पंचाक्षरी, किशोरजी फापट, मुकेशजी कलंत्री, छोटूलालजी शर्मा, स्वप्निल सावजी,नारायण महाराज, सुनीलकुमार लाहोटी, जगदीश अहिरे, मंगेश चौधरी हे सर्वजण सेवा कार्य करतात**


मुख्य वैशिष्ठ विशेष म्हणजे येथे कोणीही पदाचा मोठेपणा मिरवत नाही. प्रत्येकजण स्वतःला "माता अन्नपूर्णेचा सेवेकरी" म्हणूनच अभिमानाने ओळख करून देतो. हाच या संस्थेचा खरा संस्कार आणि सर्वात मोठा सन्मान आहे. आज या सेवायज्ञामागे असंख्य अन्नदाते, सेवेकरी, हितचिंतक आणि भाविक यांचे निःस्वार्थ योगदान उभे आहे. त्यांच्यामुळेच ही सेवा दिवसेंदिवस अधिक व्यापक होत आहे. प्रभू श्री वैद्यनाथ आणि माता अन्नपूर्णा यांच्या कृपेने हा सेवायज्ञ पुढील अनेक पिढ्यांपर्यंत अखंड सुरू राहो, अधिकाधिक भुकेल्या पोटी अन्नाचा घास पोहोचो आणि समाजात सेवा, समर्पण व माणुसकीचा दीप सदैव प्रज्वलित राहो, हीच वर्धापन दिनानिमित्त प्रार्थना श्री अन्नपूर्णा चॅरिटेबल ट्रस्ट, परळी वैजनाथच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व सेवेकरी, अन्नदाते, हितचिंतक आणि भाविकांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! संजय स्वामी सचिव , श्री अन्नपूर्णा चॅरिटेबल ट्रस्ट परळी वैजनाथ

## लोकार्थ

### एमव्ही इलेक्ट्रोसिस्टीम्सचा आयपीओ विक्रीसाठी खुला

एमव्ही इलेक्ट्रोसिस्टीम्स लिमिटेडने ("कंपनी) आपल्या इनिशियल पब्लिक ऑफरसाठी (आयपीओ) प्रत्येकी ५ दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरसाठी ४००ते ४२५चा किंमत पट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा इनिशियल पब्लिक ऑफरिंग ("आयपीओ"किंवा "इश्यू") सबस्क्रिप्शनसाठी गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी उघडला असून सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी बंद होईल.गुंतवणूकदार किमान ३४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. आजच्या तारखेनुसार कंपनीचे एकूण २,०४,५९,२०० इक्विटी शेअर्स (प्रत्येकी ₹ मूल्याचे) आऊट स्टॅंडिंग आहेत. हा आयपीओ २,९०० दशलक्ष पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची नवी विक्री आहे.इश्यू मधून मिळणाऱ्या रकमे पैकी १,८०० दशलक्ष रक्कम कंपनीच्या दीर्घकालीन कार्य भांडवलाच्या गरजा भागव ण्यासाठी, २१० दशलक्ष रक्कम नवीन पॉवर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या संशोधन, डिझाइन आणि विकास उपक्रमां मधील गुंतवणुकीसाठी, आणि उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरली जाईल.




### जाब्रा कडून इवोल्व 3 हेडसेट मालिका आणि पानाकॅस्ट U30 सादर

व्यावसायिक ऑडिओ आणि व्हिडिओ सोल्यूशन्स क्षेत्रातील जागतिक अग्रणी असलेल्या Jabra ने भारतात 'Jabra Evolve3' हेडसेट मालिका आणि 'Jabra PanaCast U30' व्हिडिओ बार सादर करण्याची घोषणा केली. आजच्या लवचिक कामाच्या पद्धतींसाठी डिझाइन केलेली ही नवीन उत्पादने, AI-सक्षम वैयक्तिक ऑडिओ आणि इंटेलिजंट व्हिडिओ तंत्रज्ञानाचा मेळ घालतात. यामुळे संस्थांना वैयक्तिक कामाच्या जागा आणि मीटिंग रूम्स अशा दोन्ही ठिकाणी अधिक अखंड, उत्पादक आणि सर्वसमावेशक सहकार्य अनुभव निर्माण करण्यास मदत मिळते.

भारतीय संस्था जसजशा लवचिक कामाच्या पद्धतींचा स्वीकार करत आहेत आणि AI-सक्षम सहकार्य तंत्रज्ञानात गुंतवणूक करत आहेत, तसतशी एंटरप्राइझ-दर्जाच्या संवाद साधनांची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि IT सेवा कंपन्यांपासून ते हायब्रिड कामाच्या पद्धतीचा अवलंब करणाऱ्या मोठ्या उद्योगांपर्यंत, सर्वच व्यवसाय अशा तंत्रज्ञानाच्या शोधात आहेत ज्यामुळे कर्मचारी कोठूनही काम करत असले तरीही सहजपणे एकमेकांशी सहकार्य करू शकतील. Jabra Evolve3 मालिका ही कंपनीची सर्वात प्रगत व्यावसायिक हेडसेट श्रेणी आहे, जी खास आजच्या हायब्रिड कार्यपद्धतीत काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी तयार करण्यात आली आहे.




### पिडिलाइट इंडस्ट्रीजचे आयटी आधुनिकीकरण यशस्वी

मिशन-क्रिटिकल एंटरप्राइझ टेक्नॉलॉजी सेवांची एक अग्रगण्य प्रदाता कंपनी कायंड्रिलने पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचे गूगल क्लाउडच्या साहाय्याने आयटी आधुनिकीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाल्याची घोषणा केली.कायंड्रिलने पिडिलाइटचे नॉन-ईआरपी वर्कलोड्स ऑन-प्रिमाइसेस आणि विद्यमान क्लाउड वातावरणातून गूगल क्लाउडवर स्थलांतरित केले आहेत, ज्यामुळे कंपनीचे डेटा सेंटरमधून बाहेर पडण्याचे काम पूर्ण झाले आहे, आणि आता ते निरंतर क्लाउड व्यवस्थापित सेवा प्रदान करत आहे. नवीन वातावरण पूर्णपणे उत्पादनात कार्यान्वित झाल्यामुळे, पिडिलाइट आता अधिक चपळ आणि लवचिक आयटी पायावर कार्यरत आहे, जो तिच्या बदलत्या व्यावसायिक गरजांना आधार देतो.या प्रकल्पामुळे सेवा प्रतिसादात २० टक्के सुधारणा, पायाभूत सुविधांची तरतूद आणि कामाच्या वेळेत ३० टक्के घट, आणि पिडिलाइटच्या ॲप्लिकेशन लँडस्केपमध्ये अधिक सातत्यपूर्ण कामगिरी साध्य झाली आहे.

### एलआयसी ऑफ इंडियाने भारत सरकारला लाभांशाचा धनादेश सुपूर्द केला

एलआयसी ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक, श्री आर. दोराईस्वामी यांनी, २७ जुलै, २०२६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत भागधारकांनी मंजूर केलेला, भारत सरकारच्या वाट्याचा लाभांश म्हणून ₹१२,२०७.२५ कोटींचा लाभांश धनादेश माननीय केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांना सादर केला.

याप्रसंगी भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाचे सचिव, श्री संजय लोहिया, यांच्यासोबत भारतीय आयुर्विमा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री रत्नाकर पटनायक, व्यवस्थापकीय संचालक श्री आर. चंदर आणि उत्तर विभागाचे विभागीय व्यवस्थापक (स्वतंत्र कार्यभार) श्री एन. एस. राघवा हे अधिकारी उपस्थित होते. एलआयसी आपल्या स्थापनेपासून ७० गौरवशाली वर्षे पूर्ण करत आहे आणि ३१.०३.२०२६ रोजी तिचा मालमत्ता आधार ५९.०३ लाख कोटी आहे. ती भारतीय जीवन विमा बाजारपेठेत आपले अग्रगण्य स्थान कायम राखत आहे.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# परळी औष्णिक विद्युत केंद्रात धनंजय कोकाटे आणि व्यंकट माने यांचा निरोप समारंभ संपन्न

## मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते गौरवपूर्ण सत्कार






**परळी | प्रतिनिधी**

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील अधीक्षक अभियंता धनंजय दिगंबर कोकाटे आणि तंत्रज्ञ-१ (संच संचालन क्र. ८) व्यंकट महादजी माने यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि उल्लेखनीय सेवेचा गौरव करत त्यांना सेवानिवृत्तीनिमित्त दि. ३१ जुलै २०२६ रोजी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात निरोप देण्यात आला.

या प्रसंगी परळी औष्णिक विद्युत केंद्रातील मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते दोन्ही मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला.मनोगत व्यक्त करताना मुख्य अभियंता सुनील इंगळे म्हणाले, "आजचा हा निरोप समारंभ माझ्यासाठी अत्यंत भावनिक आहे.अधीक्षक अभियंता धनंजय

कोकाटे आणि तंत्रज्ञ-१ व्यंकट माने यांनी महानिर्मितीच्या सेवेत तब्बल ३४ वर्षे प्रामाणिकपणे कार्य करत महानिर्मितीच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले. त्यांची कार्यनिष्ठा, शिस्त आणि समर्पण भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल."

उपमुख्य अभियंता महेश महाजन यांनी आपल्या मनोगतात धनंजय कोकाटे यांच्यासोबतच्या दीर्घ सहवासातील आठवणींना उजाळा दिला. त्यांनी सांगितले की, "जगात दुःख आहे; परंतु त्या दुःखावर मात करण्याचाही मार्ग आहे."या सम्यक मार्गाने वाटचाल केल्यास मानवास जीवनात आनंद मिळतो असे मत व्यक्त केले. त्यांनी दोन्ही सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना निरोगी, आनंदी आणि समाधानपूर्ण पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता राजीव रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) अरविंद येरणे, कार्यकारी अभियंते पंकज दगडे, मदन पवार, कार्यकारी रसायनतंत्रज्ञ सतीश मुंडे, सुनील पवार, कामगार नेते हरीराम गित्ते, डी. एन. देवकते, भीमराव शिरसाट, प्रदीप चव्हाण, शाहूराव येवते, भगवान साकसमुद्रे, संदीप काळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार आणि कोकाटे यांच्या आई कुसुमताई, बंधू जगदीश, पुत्र प्रतीक, सुपुत्री तेजस्विनी तसेच कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवासाचा आढावा घेणारी विशेष चित्रफीत परळीतील प्रसिद्ध छायाचित्रकार संदीप मोदानी (पूजा फोटो) यांनी सादर केली. या चित्रफितीत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दिवंगत स्वाती धनंजय कोकाटे यांनी धनंजय कोकाटे यांना सेवापूर्तीच्या शुभेच्छा देतानाचा प्रसंग साकारण्यात आला. हा क्षण उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आणणारा आणि अत्यंत हृदयस्पर्शी ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के. एच. गित्ते यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले. स्नेह, कृतज्ञता आणि भावनांनी ओथंबलेल्या या निरोप समारंभाने उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी स्मरणात राहील असा ठसा उमटविला.

## गुरुपौर्णिमा विशेष

# ज्ञानेश्वरी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणारे न्यायाचार्य डॉ. नामदेव (शास्त्री) सानप : डॉ. भारत कऱ्हाड




भारतीय संस्कृतीत गुरुपौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. हा दिवस गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, त्यांच्या कार्याचे स्मरण करण्याचा आणि त्यांनी दिलेल्या ज्ञानाचा आदर करण्याचा आहे. गुरु हे केवळ धार्मिक मार्गदर्शक नसतात, तर विचार देणारे, संस्कार घडवणारे आणि जीवनाला योग्य दिशा दाखवणारे असतात. समाजात ज्ञानाची परंपरा जिवंत ठेवणाऱ्या अशा व्यक्तींच्या कार्याचे स्मरण करणे हीच गुरुपौर्णिमेची खरी भावना आहे.

**भगवानगडापासून व्यापक समाजापर्यंत :**

भगवानगड हे वंजारी समाजाचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे न्यायाचार्य डॉ. नामदेव (शास्त्री) सानप यांच्याविषयी या समाजात विशेष आदराची भावना आहे. परंतु त्यांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नाही. ज्ञानेश्वरीचा अभ्यास, तिचा प्रसार, "आनंदाचे सिद्धांत" आणि आधुनिक माध्यमांतून ज्ञान लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रयत्नांमुळे त्यांची ओळख विविध समाजघटकांपर्यंत तसेच देश-विदेशातील मराठी समाजापर्यंत पोहोचली आहे.

**अभ्यास आणि साधनेचा प्रवास :**

न्यायाचार्य डॉ. नामदेव (शास्त्री) सानप यांनी आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेत प्रारंभीचे शिक्षण घेतले. त्यानंतर गुरुकुल परंपरेत न्यायशास्त्राचा सखोल अभ्यास करून "न्यायाचार्य" ही पदवी संपादन केली. पुढे मराठी विषयात उच्च शिक्षण आणि संशोधन पूर्ण केले. भारतीय तत्त्वज्ञान, संतसाहित्य, संस्कृत आणि वारकरी परंपरेचा त्यांनी सखोल अभ्यास केला. अभ्यास, साधना आणि समाजकार्य यांचा त्यांनी सुंदर समन्वय साधला.

**भगवानगडातील ज्ञानसेवा :**

भगवानगडाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी या पवित्र स्थळाला ज्ञान, संस्कार आणि समाजजागृतीचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न केले. प्रवचने, अभ्यासवर्ग, ग्रंथवाचन, धार्मिक कार्यक्रम आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमधून त्यांनी अनेकांना ज्ञानाशी जोडले. श्रद्धेबरोबरच विचारांची परंपरा जोपासण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे.

**ज्ञानेश्वरीचा सोपा अर्थ :**

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून भगवद्गीतेचा संदेश लोकभाषेत दिला. मात्र बदलत्या काळात तिचा अर्थ सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत समजावून सांगण्याची गरज निर्माण झाली. ही गरज ओळखून न्यायाचार्य डॉ. नामदेव (शास्त्री) सानप यांनी ज्ञानेश्वरीचा अभ्यास करून तिचा भावार्थ सोप्या, सरळ आणि व्यवहारातील भाषेत मांडण्यावर भर दिला. त्यांच्या प्रवचनांमुळे अनेक युवक, अभ्यासक आणि सामान्य वाचक ज्ञानेश्वरीकडे नव्या दृष्टीने पाहू लागले आहेत.

**"आनंदाचे सिद्धांत" :**

त्यांच्या कार्यातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे "आनंदाचे सिद्धांत". आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात आनंदाचा खरा स्रोत बाह्य सुखांमध्ये नसून विचार, संतुलित जीवन, कर्तव्य, आत्मपरीक्षण आणि समाधानात आहे, हा संदेश ते सातत्याने देतात. त्यामुळे विविध वयोगटांतील अनेक लोक त्यांच्या या विचारांशी जोडले गेले आहेत.

**तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग :**

ज्ञानाचा प्रसार काळानुसार बदलणाऱ्या माध्यमांतून झाला पाहिजे, ही जाणीव त्यांनी कृतीतून दाखवून दिली. ज्ञानेश्वरीचा भावार्थ आणि वैचारिक साहित्य ई-पुस्तक तसेच डिजिटल माध्यमांतून उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमामुळे देश-विदेशातील अनेक वाचकांना त्याचा लाभ होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून पारंपरिक ज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा उल्लेखनीय प्रयत्न आहे.

**साधी भाषा, व्यापक विचार :**

त्यांच्या प्रवचनांचे वैशिष्ट्य म्हणजे साधी, सहज आणि सर्वसामान्यांना समजणारी भाषा. अवघड तत्त्वज्ञानही दैनंदिन जीवनातील उदाहरणांमधून ते स्पष्ट करतात. धर्म, अध्यात्म, कुटुंब, समाज, कर्तव्य, नैतिकता आणि माणुसकी यांची सांगड त्यांच्या विचारांत दिसते. त्यामुळे त्यांच्या प्रवचनांचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित राहत नाही, तर दैनंदिन जीवनातही जाणवतो.

**समाजाला दिशा देणारे कार्य :**

आज माहितीचे अनेक स्रोत उपलब्ध आहेत; परंतु योग्य ज्ञान आणि योग्य दिशा देणाऱ्या व्यक्तींची गरज अधिक आहे. न्यायाचार्य डॉ. नामदेव (शास्त्री) सानप यांनी अभ्यास, चिंतन, लेखन, प्रवचने, ज्ञानेश्वरीचा प्रसार, "आनंदाचे सिद्धांत" आणि आधुनिक माध्यमांचा वापर यांच्या साहाय्याने समाजापर्यंत पोहोचण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. त्यामुळे अनेकांना वैचारिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रेरणा मिळाली आहे.

**कृतज्ञ अभिवादन :**

गुरुपौर्णिमेच्या पावन निमित्ताने न्यायाचार्य डॉ. नामदेव (शास्त्री) सानप यांच्या ज्ञानकार्याला विनम्र अभिवादन. त्यांनी ज्ञानेश्वरीचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेले प्रयत्न, समाजाशी ठेवलेला सततचा संवाद आणि ज्ञानाला आधुनिक माध्यमांची जोड देण्याची दूरदृष्टी यांमुळे त्यांचे कार्य विशेष महत्त्वाचे ठरते. ज्ञान, संस्कार आणि सकारात्मक जीवनदृष्टीचा हा प्रवाह निरंतर सुरू राहो आणि समाजाला प्रेरणा देत राहो, हीच गुरुपौर्णिमेनिमित्त सदिच्छा.



- डॉ. भारत द. कऱ्हाड
प्राचार्य, एन. के. वराडकर कला व आर. व्ही. बेलोसे वाणिज्य महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी

# ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे. परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे. यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री ,खासदार,आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले. त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे.ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले.आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी. आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही. कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले. केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या "म्हारपणाची शीदोरी" आहे. त्यामुळे पेन्शन हे "जीवन-मरणाचे" साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा "अरबो रूपया" सरकारजवळ आहे हा पैसा सरकार "लोकप्रतिनिधीच्या" पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना "भिक" दील्यासारखी पेंशन देत आहे. ही "लोकशाहीला" काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही "देर आज दुरूस्त आए" ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते. कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो. त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की "आपलाच पैसा आपणच चोर". त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की "जगावे की मरावे"अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत.



लेखक - रमेश कृष्णराव लांजेवार, (स्वतंत्र पत्रकार)

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

● बीड, सोमवार, 3 ऑगस्ट 2026

# देश - विदेशातही गाजलेले अण्णाभाऊंचे साहित्य आजही तितकेच प्रेरणादायी- व्याख्याते लक्ष्मण वैराळ

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा 106 वा जयंती सोहळा उत्साहात संपन्न





**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

लोकशाहीर, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त परळी येथील लहूजीनगरमधील नियोजित सभागृहाच्या जागेत जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला जयंती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात राज्याचे माजी कृषिमंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आली.

दुसऱ्या सत्रात जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते लक्ष्मण वैराळ यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतले योगदान आणि त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता यावर सखोल मार्गदर्शन केले.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची देश-विदेशात पोहोचलेली कीर्ती, त्यांच्या लेखनातून मिळणारी सामाजिक जाणीव आणि तरुण पिढीने त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन कर्तृत्वाच्या बळावर प्रगती साधावी, असा संदेश त्यांनी दिला.

यावेळी त्यांनी "माझी मुंबई" या अण्णाभाऊ साठे यांच्या लघुनाट्य याचीही माहिती दिली. "वाघाला नखं, गरुडाला पंख; तशी मुंबई मराठी माणसांची" हे घोषवाक्य त्या काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रतीक बनले होते, असे त्यांनी सांगितले. तसेच "माझी मैना" या लोकगीताचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीत झालेला प्रभाव आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभांमधील त्याचे महत्त्वही त्यांनी विशद केले.

भारतीय साहित्य आणि चित्रपटसृष्टीला अण्णाभाऊ साठे यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव करत, त्यांच्या कथांनकावर आजपर्यंत नऊ चित्रपट निर्माण झाले यामधून सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी संदेश दिला गेला असल्याचे वैराळ यांनी नमूद केले.

या जयंती सोहळ्यास पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बालाजी ढगे, संपादक नितीन ढाकणे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबूने, फुले आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे,नगर परिषद अधिकारी किरण उपाडे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी रमेश मस्के, जितेंद्र मस्के, बालासाहेब गायकवाड आणि दिलीप लोंढे यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून सहकार्य केले. कार्यक्रमास नागरिक, युवक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीच्या विकासाला नवी दिशा; नवीन एसटी बसस्थानकाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक एसटी बसस्थानकाचे उद्घाटन आमदार सुरेश धस यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी बोलताना आमदार धस यांनी हा क्षण स्वतःसाठी अत्यंत आनंदाचा व समाधानाचा असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी त्यांनी सांगितले की, सर्वसामान्य नागरिकांची 'लाल परी' म्हणून ओळखली जाणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) सेवा गेली अनेक दशके राज्याच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाची भक्कम जीवनवाहिनी ठरली आहे. दुर्गम ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गाला सुरक्षित, विश्वासार्ह व परवडणारी प्रवाससेवा उपलब्ध करून देण्याचे मोलाचे कार्य एसटी करत आहे.




नवीन बसस्थानकामुळे प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित, आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे प्रवास अधिक सुखकर होईल. तसेच आष्टी शहराच्या विकासाला नवी गती मिळण्यास या बसस्थानकाची महत्त्वपूर्ण भूमिका राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार धस यांनी एसटी प्रशासनाला विद्यार्थ्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. विद्यार्थ्यांना वेळेवर, नियमित व अखंडित बससेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रलंबित एसटी पासच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करून तो लवकर मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच नवीन बसस्थानक परिसरात सुसज्जित बेरोजगार युवक, युवा वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी नवीन व्यावसायिक गाळ्यांचे बांधकाम करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या बसस्थानकाच्या उभारणीसाठी योगदान देणारे शासन, संबंधित अधिकारी, अभियंते, कर्मचारी तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

# बेलगाव ग्रामस्थांच्या वतीनेअध्यक्ष सुखदेव पोकळे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव

**आष्टी |प्रतिनिधी**

शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टीचे संस्थापक अध्यक्ष मा. सुखदेव सूर्यभान पोकळे यांच्या शिक्षण, समाजसेवा आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा बेलगाव येथे आयोजित भव्य गुणवंत सत्कार समारंभात गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सुखदेव पोकळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबविल्याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक केले. यावेळी वक्त्यांनी सांगितले की, सुखदेव सूर्यभान पोकळे यांनी शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था



शैक्षणिक, सामाजिक व संस्कारक्षम उपक्रम यशस्वीपणे राबवत असून अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळत आहे. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच समाजहितासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचाही सन्मान करण्यात आला. या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण झाली असून समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक संदेश पोहोचला.

कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी सुखदेव सूर्यभान पोकळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील सामाजिक व शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अण्णाभाऊ साठे परिवर्तनवादी साहित्यिक- अँड. मनोज संकाये

## अँड. मनोज संकाये मित्र मंडळातर्फे विनम्र अभिवादन

**परळी वैजनाथ :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अँड. मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने बस स्टँड परिसरातील अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक व परिवर्तनवादी कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजातील वंचित, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास बालाजी गुट्टे, सुंदर आव्हाड, संजय मुंडे, कैलास रिकिबे, वसंत मुंडे, धनराज रोडे, सतीश फड यांच्यासह मित्र मंडळाचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




# मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टीत शेकडो रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग; भव्य रक्तदान शिबिर यशस्वी

**आष्टी| प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाचे मा. श्री. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाज, आष्टी तालुका यांच्या वतीने नगरपंचायत कार्यालय, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभर चाललेल्या या शिबिरात शेकडो रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली.

'रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' हा संदेश समाजात रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात आष्टी शहरासह तालुक्यातील युवक, मुली व महिला ,सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. रक्तदानासाठी आलेल्या प्रत्येक रक्तदात्याने समाजहितासाठी पुढाकार घेत मानवतेचा संदेश दिला.




शिबिरासाठी सुसज्ज वैद्यकीय व्यवस्था, तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांचे पथक तसेच रक्त संकलनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. रक्तदात्यांच्या आरोग्याची काळजी घेत आवश्यक वैद्यकीय तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्त संकलित करण्यात आले. रक्तदानानंतर सर्व रक्तदात्यांसाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती.

या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचा सन्मान करण्यात आला. आयोजकांच्या वतीने प्रत्येक रक्तदात्यास मोफत ट्रॅकसुट भेट देऊन त्यांच्या सामाजिक योगदानाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे युवकांमध्ये रक्तदानाविषयी अधिक जागरूकता निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांचा वर्षाव न करता समाजाला जीवनदान देणारा हा उपक्रम राबविण्यात आल्याने सर्व स्तरातून आयोजकांचे कौतुक करण्यात आले. शिबिरात संकलित झालेल्या रक्ताचा गरजू रुग्णांना मोठा लाभ होणार असून, हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सकल मराठा समाज, आष्टी तालुका यांच्या वतीने आयोजित या भव्य रक्तदान शिबिरामुळे सामाजिक ऐक्य, सेवाभाव आणि मानवतेचा संदेश अधिक दृढ झाला. शेकडो रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.